# नवीन मंडळ्या सुरू करा

मुलांना शिकविणाऱ्यांनी C7b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभु, तुझ्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने जिथे विश्वासणाऱ्यांची मंडळी नसेल अशा ठिकाणी नवी मंडळी सुरू करण्यास लोकांना शिष्य करण्याच्या तुझ्या आज्ञेचे पालन करण्यासाठी कृपा करून आमच्या मंडळीला साहाय्य कर."


## 1. नवीन मंडळ्या व गट सुरू करण्यासाठी प्रार्थना व देवाच्या वचनातून तयारी करा.

मंडळी म्हणजे येशूच्या अनुयायांचे एकत्र जमणे होय.

**पाहा मत्तय 28:18-20** मध्ये नवीन विश्वासणाऱ्यांनी खरेखुरे शिष्य व्हावे यासाठी तुम्ही त्यांना काय करायला शिकविले पाहिजे. (उत्तर : त्यांचा बाप्तिस्मा करून येशूच्या आज्ञाचे पालन करायला शिकविणे. सात मुख्य आज्ञेमध्ये त्याने दिलेल्या सर्व आज्ञाचा सोप्या स्वरूपात समावेश केलेला आहे. आरंभीच्या मंडळीने अगदी सुरुवातीपासूनच येशूच्या सर्व आज्ञांचे पालन केले. जिथे जिथे प्रेषितांनी शिष्यांनी अशाप्रकारे लोकांना शिष्य केले तिथे तिथे मंडळ्या बहुगुणित झाल्या).

**पाहा प्रे. कृ. 2:37 47** मध्ये नव्या करारातील आरंभीच्या मंडळीमध्ये विश्वासणाऱ्यांनी येशूच्या आज्ञाचे कसे पालन केले:

- येशूची कोणती आज्ञा पाळण्यास पेत्र प्रथम नवीन विश्वासणाऱ्यांना सांगत असे? *(वचन 38)*



- पश्चात्ताप करणाऱ्या पातकी लोकांना विश्वासणारे असे संबोधण्यासाठी त्यांनी कोणत्या आज्ञेचे पालन केले? *(वचन 41)*
- येशूने आज्ञा दिल्यानुसार, बाप्तिस्मा झालेले नवीन विश्वासणाऱ्यांनी स्वत:ला कोणत्या चार गोष्टी करण्यासाठी समर्पित केले? *(वचन 42)*
- विश्वासणाऱ्यांनी एकमेकांवर कसे प्रेम करावे याबद्दल स्पष्टपणे वचन 42 मधील कोणत्या गोष्टी सांगतात. (प्रेषितांच्या शिक्षणाचा स्वीकार प्रभूच्या मरणाचे स्मरण करण्यासाठी भाकरी मोडणे सहभागिता व प्रार्थना)
- येशूच्या अन्य कोणत्या मुख्य आज्ञाचे पालन त्यांची सहभागिता करीत होती? (वचने 44-45).

इफिस 4:11-12 मध्ये देवाने तुमच्या मंडळीला कोणत्या प्रकारचे लोक देण्याचे अभिवचन दिले आहे?

त्या पाच प्रकारच्या लोकांपैकी कोणत्या दोन प्रकारचे लोक सर्वसाधारणपणे इतरांचे मंडळ्या सुरू करण्यासाठी पुढारी पण करतात? (उत्तर: प्रेषित व सुवार्तिक)

नवीन मंडळ्या व गट सुरू करण्यासाठीची मार्गदर्शकतत्वे

**मार्गदर्शकतत्व 1 :** स्थानिक परिस्थितीला अनुरूप अशा पद्धती निवडा. प्रत्येक वेळी एकच पद्धत तुम्ही वापरली पाहिजे असे नाही. बहुतेक मंडळ्या पुढील तीन पैंकी एका मार्गाचा अवलंब करतात, तुमच्या परिस्थितीनुसार योग्य असेल ती पद्धत निवडा.

1. रोपण – मंडळी रोपण करणारा किंवा लहानसा मंडळी रोपण करणारा चमू ह्यांना माता मंडळी कडून इतर भागांमध्ये आणि अन्य संस्कृतींच्या लोकांमध्ये मंडळ्या सुरू करण्यासाठी पाठविले जाते, जसे प्रे. कृ. 13:1–3 मध्ये सांगितले आहे.
2. जन्म देणे – माता मंडळीतील सभासद त्यांच्या जवळपासच्या समाजामध्ये सुवार्ताप्रसार करतात, नवीन विश्वासणाऱ्यांना शिष्य करतात आणि त्या समाजातील नवीन पुढाऱ्यांना प्रशिक्षण देतात. कोणालाही आपली मूळ माता मंडळी सोडण्याची गरज नाही याचे उदाहरण प्रे. कृ. 10 मध्ये दिलेले आहे.
3. काम सोपवणे – काही विश्वासणारे माता मंडळी सोडून जवळच नवीन असा गट स्थापन करतात. मोठ्या औद्योगिक भागतील मंडळ्यांमध्ये एकाच सांस्कृतिक गटात जिथे जिथे वाहतूक सुलभ असते अशा ठिकाणी हे योग्य ठरते. याचे उदाहरण शास्त्रलेखात आढळत नाही.

**मार्गदर्शकतत्व 2:** तुमची ओळख असलेल्या ठिकाणी काम करा. सर्वसाधारणपणे सेवक त्यांचे मित्रमंडळी वा नातेवाईक असतील अशा ठिकाणी गेले तर तिथे नवीन मंडळ्यांची सुरुवात करणे तुलनेने सोपे असते.

**मार्गदर्शकतत्व 3:** लोकसंख्येच्या जो वर्ग अधिक प्रतिसाद देतो त्यावर लक्ष केंद्रित करा. लोकांनी प्रतिसाद दिला नाही तर तुमच्या पायांची 'धूळ झटकून टाका' ही येशूची आज्ञा लक्षात घ्या. निरनिराळी पार्श्वभूमी असलेले लोक एकत्र येतात तेव्हा त्यामुळे गैरसमज निर्माण होतो आणि काही नव्या मंडळ्या अपयशी ठरतात. एकच मोठी मंडळी सुरू करण्यापेक्षा अनेक लहान लहान मंडळ्या सुरू करणे केव्हाही अधिक चांगले. मोठ्या मंडळीत सांस्कृतिक विविधतेमुळे संघर्ष होतो. गलती येथील मंडळीत नेमके हेच घडले होते. (तुम्हांला माहीत नसेल तर पौलाने गलतीकरांस लिहिलेले पत्र वाचा)

**मार्गदर्शकतत्व 4:** विश्वासणाऱ्यांनी साप्ताहिक उपासनेसाठी एकत्र येण्यास सुरुवात केल्यावर सुवार्ताप्रसार करीत राहा. काही मंडळ्या अपयशी ठरतात कारण मंडळ्यांनी एकत्र जमण्यास सुरुवात केली की आपले काम संपले असेच सेवकांना वाटते.

**मार्गदर्शकतत्व 5:** गट लहान असला तरी उपासनासभेचे योग्य नियोजन करा. आळशी सेवक उपासना अगदी नीरस कंटाळवाण्याप्रकारे चालवितात त्यामुळे काही लोक मंडळी सोडून जातात.

**मार्गदर्शकतत्व 6:** प्रत्येक सेवकाला त्याचे काम नेमून घ्या. प्रत्येकाला त्याचे काम समजल्याची खात्री करून घ्या. प्रत्येकाने आपआपले काम चांगल्याप्रकारे करावे. आपल्या पत्नीने काय करावे आणि काय करू नये याविषयी सेवकाने तिच्याशी सहमत असावे. काही मंडळ्या अपयशी ठरतात कारण सेवकांना जी गोष्ट उत्तम प्रकारे करता येत नाही ती त्यांना करण्यास भाग पाडले जाते; अन्यथा ते बाहेर फेकले जातात.

## 2. आठवड्यात वि श्वासणाऱ्यांनी करावयाच्या कार्यक्रमांचे सहकाऱ्यांबरोबर नियोजन करा.

जवळपासच्या दुर्लक्षित समाजात नव्या मंडळ्या सुरू करा. नव्या करारामध्ये सांगितल्यानुसार विश्वासणारे सर्व गोष्टी करतात. तेव्हा नव्या गटाची मंडळी होते. यामध्ये येशूच्या आज्ञा आणि त्याच्या आज्ञांमधून पुढे येणारे कार्यक्रम ह्या गोष्टींचा समावेश आहे.

पुढे काही कार्यक्रम दिले आहेत त्यापैकी, तुमच्या मंडळीने किंवा तुम्ही सुरू करणार असणाऱ्या मंडळीने कोणत्या कार्यक्रमांचा अद्याप विकास करणे बाकी आहे त्यावर खूण करा. सहकाऱ्यांच्या साहाय्याने नियोजन करून तसे करा.

[ ] येशूसाठी साक्ष द्या आणि पश्चात्ताप झालेल्या पातकी लोकांच्या विश्वासाची त्यांचा बाप्तिस्मा करून खात्री करा.

[ ] नवीन मंडळ्या सुरू करा आणि दुर्लक्षित लोकांकडे सेवक पाठवा.

[ ] सर्व विश्वासणाऱ्यांना प्रभुभोजनासह उपासनेच्या सर्व कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास साहाय्य करा.

[ ] शरीररूपी मंडळीत प्रेमळ नाते जोपासा आणि वैवाहिक व कौटुंबिक जीवन बळकट करा.

[ ] समस्या असलेल्या व्यक्ती व कुटुंबांना क्षमा करून समेट करण्यास साहाय्य करा.

[ ] मंडळीला पवित्र आत्म्यांच्या साहाय्याने पवित्रपणा, दररोजचे नवीकरण आणि पालट करणे याचा शोध घेण्यास मदत करा.

[ ] इतरांच्या गरजांसाठी उदारपणे दान द्या.

[ ] प्रार्थना मध्यस्थी करणे सैतानाविरुद्ध आध्यात्मिक युद्ध पुकारणे, आणि कुटुबांना दररोज कौटुंबिक भक्तीसाठी साहाय्य करणे,

[ ] देवाचे वचन लोकांच्या जीवनाला लागू करा आणि खोटे सिद्धांत शिकविणाऱ्या 'लांडग्यां' पासून त्यांचे रक्षण करा.

[ ] नव्या मंडळ्यांचे नवशिके पाळकीय देखभाल करणारे वडील, मिशनरी आणि पुढारी ह्यांना प्रशिक्षण देणे.

[ ] सर्व विश्वासणाऱ्यांना त्यांच्या विविध आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करून सेवा करता यावी यासाठी मंडळीचे नियोजन करून त्यावर देखरेख ठेवा.

[ ] हे कार्यक्रम अमलात आणण्यासाठी आसपासच्या मंडळ्यांशी सहकार्य करा.

**3. आगामी उपासना सभेची तुमच्या सहकाऱ्यांबरोबर योजना आखा.**

प्रे. कृ. 2:37-47 मधून नव्या करारातील पहिल्या मंडळीची सुरुवात कशी झाली त्याचा कथावृत्तांत सांगा आणि वर दिलेले प्रश्न विचारा.

देव तुमच्या मंडळीला नवीन मंडळ्या सुरू करण्यासाठी इतरांचे पुढारीपण करणारे लोक देतो हे इफिस 4:11-12 मधून स्पष्ट करून सांगा आणि हे करण्यासाठी मदतनीस देण्यास देवाला विनंती करा.

येशूच्या आज्ञांचे पालन करणारे शिष्य तयार करण्याविषयीची मत्तय 20:18-20 मध्ये नमूद केलेली येशूची आज्ञा स्पष्ट करून सांगा. येशूच्या मुख्य आज्ञा तुमच्या मंडळीला ठाऊक आहेत याची खात्री करून घ्या.

नवीन मंडळ्या सुरू करण्यासाठी वर उल्लेख केलेली सहा मार्गदर्शकतत्वे स्पष्ट करा.

तुम्ही वर खूण केलेले कोणते कार्यक्रम तुमच्या मंडळीने हाती घेणे आवश्यक आहेत त्याचे स्पष्टीकरण करा आणि त्याविषयी योजना आखण्यास विश्वासणाऱ्यांना साहाय्य करा. नवीन मंडळ्या सुरू करणाऱ्या सेवकांना त्यांच्या प्रगतीचा अहवाल सादर करण्यास सांगा.

मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करण्यास सांगा.

दोन वा तीन जणांचे गट तयार करा, त्यामध्ये एकमेकांसाठी प्रार्थना करा, नवीन मंडळ्या सुरू करण्यासाठी योजना आखा आणि नव्या करारात सांगितल्यातुसार काही कार्यक्रम हाती घ्या.

अंत्युखियातील मंडळीने केले त्याप्रमाणे मंडळ्या सुरू करण्याचे काम सेवकांवर सोपवून द्या (प्रे. कृ. 13:1-3)

प्रभुभोजनाजी ओळख करून देण्यासाठी प्रे. कृ. 2:42 व 46 वाचा नवीन मंडळ्यांनी अगदी आरंभापासूनच प्रभुभोजनाचा विधी साजरा करावा आणि हे त्यांना घरातही करता येईल हे स्पष्ट करून सांगा.

पाठ करा इफिस 4:11-12.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net